!! श्री !!

शिवसेना

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४०९ ०७/१२/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# ग्रीन फिल्डसाठी नक्षत्रवाडी कांचनवाडीची निवड करा शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची मागणी

## आयुक्त सुनिल केंद्रेकर यांना निवेदन

**संभाजीनगर ( दि ८ )** – बिडकीन परिसरात सुरु असलेल्या महत्वाकांक्षी डिएमआयसी व वाळुज औद्योगिक वसाहतींला लागुन असलेल्या नक्षत्रवाडी कांचनवाडी परिसरात ११२ एकर शासकिय गायरान जमीन एकाच ठिकाणी उपलब्ध असणे व पालिका हद्दितील या विकसनशिल भागात मुलभूत सोयी सुविधा देणे ही सहज सेपे असल्याचे स्मार्ट सिटी अंतर्गत ग्रीन फिल्ड प्रकल्पासाठी नक्षत्रवाडी कांचनवाडीचा विचार करावा अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी महानगरपालिका आयुक्त सुनिल केंद्रेकर व महाराष्ट्र राज्याचे महसुल प्रधान सचिव व नगरविकास प्रधान सचिव यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.

स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत उभारल्या जाणाऱ्या राज्यातील १० शहरांना रिडेव्हलपमेंट, रेट्रोफिटींग किंवा ग्रीन फिल्ड यापैकी एक पर्याय निवडून काम करण्याची मुभा केंद्र शासनाने दिली होती, त्यामुळे ग्रीनफिल्डच्या माध्यमातुन स्मार्टसिटीचा प्रकल्प राबवण्याचे ठरवण्यास आले होते. त्यासाठी नक्षत्रवाडी कांचनवाडी पर्याय सर्वच दृष्टीने योग्य असल्याचे खासदार चंद्रकांत खैरे यांनी निवेदनास म्हटले आहे. याच भागात युआडीएसएसएमटी अंतर्गत होणाऱ्या एसटीपी प्रकल्पातुन ७० ते ८० टक्के पुर्नवापरासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. शिवाय शहराचा पाणीपुरवठा पैठणहून होत असल्यामुळे कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय ग्रीनफिल्ड पाणी उपलब्ध होणार आहे. शिवाय शहराचा पाणीपुरवठा पैठणहुन होत असल्यामुळे कोणत्याही अतिरिक्त खर्चा शिवाय ग्रीन फिल्ड पाणी उपलब्ध करता येऊ शकते असेही निवेदनास नमूद केली आहे.

प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमीनींच्या अधिग्रहणाला प्रश्न ही या भागात भेडसावणार नाही, शासकिय मालकीची गायरान जमीन या भागात एकाच ठिकाणी ११२ एकर उपलब्ध आहे, तर इतर आवश्यक जमीन ही सहज उपलब्ध होऊ शकते इतर पर्याय हे १५ ते २० किमी दुर असुन त्या पर्यायी जागा ह्या उंचावर असल्याने सद्यस्थितीत ही तेथे पाणीपुरवठा करणे अवघड जात या सर्व बांबीचा सकारात्मक एकत्रित विचार करुन स्मार्ट सिटीतील ग्रीन फिल्ड प्रकल्पासाठी कांचनवाडी नक्षत्रवाडी या पर्यायाचा विचार करण्याची मागणी खासदार चंद्रकांत खैरे यांनी निवेदनात केली आहे.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन/ गणेश वाघ

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525